म. ग्रं. सं. ठाणें
विषय : काव्य
सं. क्र. ९५३९
९६५८

# गंधवती



संकलक
प्र. अ. भारती

प्राथमिक शिक्षकांचा प्रातिनिधिक काव्य - संग्रह

सुप्रभा प्रकाशन, बडनेरा.
मूल्य : पंच्याहत्तर नवें पैसे

REFBK-0010550
REFBK-0010550

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे, स्वामित्व
अनुक्रम 39५७२८
क्रमांक ...१५३९...... नों: दि: २-६.१.१०.६९

• सुप्रभा प्रकाशन, पुष्प : दुसरें

• प्राथमिक शिक्षकांचे प्रातिनिधिक काव्यसंग्रह

# गं ध व ती

REFBK-0010550
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५५६

• संकलक

प्र. अ. भारती

• मूल्य : पंच्याहत्तर नये पैसे

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१५ वि: आयु..
क्रमांक १५३८ नों: २५/११/६१

| : कवि : | : पत्ता : |
|---|---|
| ◆ श्री. नीलकांत ढोले | मु. पो. मोरगांव अर्जूनी जि. भंडारा |
| ◆ श्री. मुकुंद शेळके | ,, पारडसिंगा जि. नागपूर |
| ◆ श्री. वसंत राजस | ,, ४७५६, चवाट गल्ली, बेळगांव |
| ◆ श्री. ना. रा. किल्लेकर | ,, २४६०, कामत गल्ली, ,, |
| ◆ श्री. राम भोयर | ,, वऱ्हा जि. अमरावती. |
| ◆ श्री. निर्मला धोत्रीकर | ,, वाशी जि. उस्मानाबाद. |
| ◆ श्री. कृ. बा. राऊत | ,, दातिवरे जि. ठाणे |
| ◆ श्री. अशोक पाटील | ,, बेसिक ट्रेनिंग कॉलेज, जमखंडी जि. बिजापूर |
| ◆ श्री. विनायक कुळकर्णी | ,, नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पूणें २ |
| ◆ श्री. म. भि. कुळकर्णी | ,, ३०/२८ एरंडवणें पूणें ४ |
| ◆ सौ. सिंधु खंडाग्नित | ,, प्रा. कन्या शाळा, रामटेक जि. नागपूर |
| ◆ श्री. बा. मा. हराळे | ,, भवानीनगर, जि. द. सातारा |
| ◆ श्री. मा. न. सोनार | ,, बहादरपूर, पूर्व खानदेश |
| ◆ श्री. वा. शं. दाते | ,, मेंडसी, जि. अकोला |
| ◆ श्री. भुजंग अ. देशपांडे | ,, उंबरगे कोरट, जि. उस्मानाबाद |
| ◆ श्री. गो. ग. कोसटवार | ,, बेसिक ट्रेनिंग कॉलेज, वाशिम जि. अकोला |
| ◆ श्री. रा. वि. कुळकर्णी | ,, ७५९/४४ पर्वतीदर्शन डेक्कण जीमखाना पूणें ४ |
| ◆ श्री. रा. ना. पांडे | ,, आराळा जि. अमरावती |
| ◆ श्री. प्र. अ. भारती | ,, बडनेरा जि. अमरावती |
| ◆ श्री. दि. य. हरणे | ,, मोरगांव अर्जूनी जि. भंडारा |

★

## भूमिका :

प्रस्तुत केवळ प्राथमिक शिक्षकांचा प्रातिनिधिक काव्य संग्रह प्रकाशित करतांना, मला अत्यानंद होतो. पण कोणकोणत्या यातायाती कराव्या लागल्यांत हे लिहण्यापेक्षा न लिहलेलंच बरं ! तथापि कवि मित्रांकडून मिळालेलं सहकार्य काव्य संग्रह प्रकाशित होण्याला मोलाचं ठरावं इतकं महत्वाचं आहे. त्या बद्दल त्यांचे मी वेगळे आभार मानणं म्हणजे त्यांनी दिलेल्या सहकार्याला गालबोट लागावं. अस्तु तें टाळतोंच !

अप्रकाशित आणि तथाकथित कवींचीं संकलीत पुस्तकें आजच्या नव्या दृष्टीकोनाच्या. रसिक टीकाकारांच्या दृष्टींतून; हेटाळणीचा विषय ठरावींत इतकी अमूल्य ( ज्यांना मूल्य नाही ) असतात. अशी मतें अलिकडे वृत्तपत्रांतून वाचावयास मिळाली असतांहि हा एक खुळा प्रयत्न जाणून बुजून केलेला आहे. अर्थात यांत कुणाहि विद्वान रसिकाला दुखविण्याचा हेतू नसून, तो त्यांच्या दृष्टीने; तथाकथित कवींना प्रकाशांत आणून सुखाविण्याचा आहे असे गृहित धरायला हरकत नसावी.

प्राथमिक शिक्षक या व्यवसायाचे बंधन असूनहि माननीय डॉ. **भा. कृ. दिवाणजी**, नगराध्यक्ष; श्री. **ब. शि. दातेराव**, अध्यक्ष शिक्षण समिती यांनी मला काव्य संग्रह प्रकाशित करण्यास दिलेली परवानगी मी उदारतेचे व साहित्यभिमुख रसिक वृत्तीचे एक अंगच समजतो. तसेच श्री. **जोशी, सचिव** न. पा. व श्री. **नेवासेकर** यांचे सदैव मिळणारे उत्तेजन! माझे साहित्यिक मित्र श्री. **मनोहर तल्हार** श्री. **मधुकर केचे**, एम्. ए. श्री. **मधुकर तायडे**, बी. ए. श्री. **वसंत पेंढरकर**, बी. ए. श्री. **दत्ता कबीश्वर** आदींचे मिळालेले सहकार्यहि माझ्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

— **संकलक**

दा. क्र. 10550

**लाजरा गारवा : नीलकांत ढोले**

आज लाजला गारवा
अशा गुलाबी थंडींत
आला उत्साह भरुन
मन माझें ओसंडीत

वेडा अनिल विहरें
मत्त आपुल्या नादांत
दूरवर मन गेलें
नाही आज आवरत

दिसे डोंगराची सीमा
गुंग कुशींत धुक्याच्या
अन् आभाळाची निळी
कडा, चुंबीतें ओठांच्या

नाही लागली चाहूल
आज नाजूक उषेची
नाही कानावरी लय
तिच्या मधु पैंजणाची

नाही आज चिंव चिंव
येत कोंवळ्या जीवांची
कुठें लोपलें तें रव
व्यथा जाणवे मनाची

काय घेतली पूर्वेने
दडी भयाण भुयारी
वाटे खोल हुरहूर
माझ्या नाजूक जिव्हारीं

**आहुती : राम भोयर**

अंतराळी फिरली ' लायका '
शोधायाला गूढ उद्याचें
परी न पडलें यश पदरीं
नशिबी आले आहुतीचे . . . .
जर का जगली असती वेडी
म्हणलें असते ' कुत्र्याचा जीव '
परी आहुतीनें जगीं जाहली
अमरत्वाची जगास जाणीव. . . .

• • •

## भूमिका :

प्रस्तुत केवळ प्राथमिक शिक्षकांचा प्रातिनिधिक काव्य संग्रह प्रकाशित करतांना, मला अत्यानंद होतो. पण कोणकोणत्या यातायाती कराव्या लागल्यांत हे लिहण्यापेक्षा न लिहलेलंच बरं ! तथापि कवि मित्रांकडून मिळालेलं सहकार्य काव्य संग्रह प्रकाशित होण्याला मोलाचं ठरावं इतकं महत्वाचं आहे. त्या बद्दल त्यांचे मी वेगळे आभार मानणं म्हणजे त्यांनी दिलेल्या सहकार्याला गालबोट लागावं. अस्तु तें टाळतोंच !

अप्रकाशित आणि तथाकथित कवींचीं संकलीत पुस्तकें आजच्या नव्या दृष्टीकोनाच्या. रसिक टीकाकारांच्या दृष्टींतून; हेटाळणीचा विषय ठरावींत इतकी अमूल्य ( ज्यांना मूल्य नाही ) असतात. अशी मतें अलिकडे वृत्तपत्रांतून वाचावयास मिळाली असतांहि हा एक खुळा प्रयत्न जाणून बुजून केलेला आहे. अर्थात यांत कुणाहि विद्वान रसिकाला दुखविण्याचा हेतू नसून, तो त्यांच्या दृष्टीने; तथाकथित कवींना प्रकाशांत आणून सुखाविण्याचा आहे असे गृहित धरायला हरकत नसावी.

प्राथमिक शिक्षक या व्यवसायाचे बंधन असूनहि माननीय डॉ. **भा. कृ. दिवाणजी**, नगराध्यक्ष; श्री. **ब. शि. दातेराव**, अध्यक्ष शिक्षण समिती यांनी मला काव्य संग्रह प्रकाशित करण्यास दिलेली परवानगी मी उदारतेचे व साहित्याभिमुख रसिक वृत्तींचे एक अंगच समजतो. तसेच श्री. **जोशी, सचिव** न. पा. व श्री. **नेवासेकर** यांचे सदैव मिळणारे उत्तेजन! माझे साहित्यिक मित्र श्री. **मनोहर तल्हार** श्री. **मधुकर केचे**, एम्. ए. श्री. **मधुकर तायडे**, बी. ए. श्री. **वसंत पेंढरकर**, बी. ए. श्री. **दत्ता कवीश्वर** आदींचे मिळालेले सहकार्यहि माझ्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

– **संकलक**

दा. क्र. १०४४०

## लाजरा गारवा : नीलकांत ढोले

आज लाजला गारवा
अशा गुलाबी थंडींत
आला उत्साह भरुन
मन माझें ओसंडीत

वेडा अनिल विहरें
मत्त आपुल्या नादांत
दूरवर मन गेलें
नाही आज आवरत

दिसे डोंगराची सीमा
गुंग कुशींत धुक्याच्या
अन् आभाळाची निळी
कडा, चुंबीतें ओठांच्या

नाही लागली चाहूल
आज नाजूक उषेची
नाही कानावरी लय
तिच्या मधु पैंजणाची

नाही आज चिंव चिंव
येत कोंवळ्या जीवांची
कुठें लोपलें तें रव
व्यथा जाणवे मनाची

काय घेतली पूर्वेने
दडी भयाण भुयारी
वाटे खोल हुरहूर
माझ्या नाजूक जिव्हारीं

●

## आहुती : राम भोयर

अंतराळी फिरली 'लायका'
शोधायाला गूढ उद्याचें
परी न पडलें यश पदरी
नशिबी आले आहुतीचे ....
जर का जगली असती वेडी
म्हणलें असते 'कुत्र्याचा जीव'
परी आहुतीनें जगीं जाहली
अमरत्वाची जगास जाणीव....

● ● ●

• प्रथमावृत्ति

• १५ आगष्ट १९५६

• या आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

• मुखपृष्ठ : अनंत आकरे, अमरावती

• मुद्रक : श्री. एस्. एस्. संसारे,
सिद्धार्थ मुद्रणालय, बडनेरा

• प्रकाशक : **प्र. अ. भारती**
सुप्रभा प्रकाशन
बडनेरा रेल्वे [ मुं. रा. ]

★

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3715 वि: आयु..
क्रमांक 1432 नों: ता: 24/11/61



## : कवि :

| | | |
|---|---|---|
| ◆ श्री. नीलकांत ढोले | मु. पो. | मोरगांव अर्जूनी जि. भंडारा |
| ◆ श्री. मुकुंद शेळके | ,, | पारडसिंगा जि. नागपूर |
| ◆ श्री. वसंत राजस | ,, | ४७५६, चवाट गल्ली, बेळगांव |
| ◆ श्री. ना. रा. किल्लेकर | ,, | २४६०, कामत गल्ली, ,, |
| ◆ श्री. राम भोयर | ,, | वऱ्हा जि. अमरावती. |
| ◆ श्री. निर्मला धोत्रीकर | ,, | वाशी जि. उस्मानाबाद. |
| ◆ श्री. कृ. बा. राऊत | ,, | दातिवरे जि. ठाणे |
| ◆ श्री. अशोक पाटील | ,, | बेसिक ट्रेनिंग कॉलेज, जमखंडी जि. बिजापूर |
| ◆ श्री. विनायक कुळकर्णी | ,, | नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पूणें २ |
| ◆ श्री. म. भि. कुळकर्णी | ,, | ३०/२८ एरंडवणें पूणें ४ |
| ◆ सौ. सिंधु खंडाअित | ,, | प्रा. कन्या शाळा, रामटेक जि. नागपूर |
| ◆ श्री. बा. मा. हराळे | ,, | भवानीनगर, जि. द. सातारा |
| ◆ श्री. मा. न. सोनार | ,, | बहादरपूर, पूर्व खानदेश |
| ◆ श्री. वा. शं. दाते | ,, | मेंडसी, जि. अकोला |
| ◆ श्री. भुजंग अ. देशपांडे | ,, | उंबरगे कोरट, जि. उस्मानाबाद |
| ◆ श्री. गो. ग. कोसटवार | ,, | बेसिक ट्रेनिंग कॉलेज, वाशिम जि. अकोला |
| ◆ श्री. रा. वि. कुळकर्णी | ,, | ७५९/४४ पर्वतीदर्शन डेक्कण जीमखाना पूणें ४ |
| ◆ श्री. रा. ना. पांडे | ,, | आराळा जि. अमरावती |
| ◆ श्री. प्र. अ. भारती | ,, | बडनेरा जि. अमरावती |
| ◆ श्री. दि. य. हरणे | ,, | मोरगांव अर्जूनी जि. भंडारा |

★

## भू मि का :

प्रस्तुत केवळ प्राथमिक शिक्षकांचा प्रातिनिधिक काव्य संग्रह प्रकाशित करतांना, मला अत्यानंद होतो. पण कोणकोणत्या यातायाती कराव्या लागल्यांत हे लिहण्यापेक्षा न लिहलेलंच बरं ! तथापि कवि मित्रांकडून मिळालेलं सहकार्य काव्य संग्रह प्रकाशित होण्याला मोलाचं ठरावं इतकं महत्वाचं आहे. त्या बद्दल त्यांचे मी वेगळे आभार मानणं म्हणजे त्यांनी दिलेल्या सहकार्याला गालबोट लागावं. अस्तु तें टाळतोंच !

अप्रकाशित आणि तथाकथित कवींचीं संकलीत पुस्तकें आज–च्या नव्या दृष्टीकोनाच्या. रसिक टीकाकारांच्या दृष्टींतून; हेटाळणीचा विषय ठरावींत इतकी अमूल्य ( ज्यांना मूल्य नाही ) असतात. अशी मतें अलिकडे वृत्तपत्रांतून वाचावयास मिळाली असतांहि हा एक खुळा प्रयत्न जाणून बुजून केलेला आहे. अर्थात यांत कुणाहि विद्वान रसिकाला दुखविण्याचा हेतू नसून, तो त्यांच्या दृष्टीने; तथा–कथित कवींना प्रकाशांत आणून सुखाविण्याचा आहे असे गृहित धरायला हरकत नसावी.

प्राथमिक शिक्षक या व्यवसायाचे वंधन असूनहि माननीय डॉ. **भा. कृ. दिवाणजी**, नगराध्यक्ष; श्री. **ब. शि. दातेराव,** अध्यक्ष शिक्षण समिती यांनी मला काव्य संग्रह प्रकाशित करण्यास दिलेली परवानगी मी उदारतेचे व साहित्यभिमुख रसिक वृत्तीचे एक अंगच समजतो. तसेच श्री. **जोशी, सचिव** न. पा. व श्री. **नवासेकर** यांचे सदैव मिळणारे उत्तेजन! माझे साहित्यिक मित्र श्री. **मनोहर तल्हार** श्री. **मधुकर केचे**, एम्. ए. श्री. **मधुकर तायडे**, बी. ए. श्री. **वसंत पेंढरकर**, बी. ए. श्री. **दत्ता कवीश्वर** आदींचे मिळालेले सहकार्यहि माझ्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

**– संकलक**

दा. क्र. १०४५०

## लाजरा गारवा : नीलकांत ढोले

आज लाजला गारवा
अशा गुलाबी थंडींत
आला उत्साह भरुन
मन माझें ओसंडीत

वेडा अनिल विहरें
मत्त आपुल्या नादांत
दूरवर मन गेलें
नाही आज आवरत

दिसे डोंगराची सीमा
गुंग कुशींत धुक्याच्या
अन् आभाळाची निळी
कडा, चुंबीतें ओठांच्या

नाही लागली चाहूल
आज नाजूक उषेची
नाही कानावरी लय
तिच्या मधु पैंजणाची

नाही आज चिंव चिंव
येत कोंवळ्या जीवांची
कुठें लोपलें तें रव
व्यथा जाणवे मनाची

काय घेतली पूर्वेने
दडी भयाण भुयारी
वाटे खोल हुरहूर
माझ्या नाजूक जिव्हारीं

•

## आहुती : राम भोयर

अंतराळी फिरली ' लायका '
शोधायाला गूढ उद्याचें
परी न पडलें यश पदरी
नशिबी आले आहुतीचे . . . .
जर का जगली असती वेडी
म्हणलें असते ' कुत्र्याचा जीव '
परी आहुतीनें जगीं जाहली
अमरत्वाची जगास जाणीव. . . .

• • •

## स्मृ ति भों व ती : नीलकांत ढोले

दाट गर्द राई माजीं
घोटाळतें मन माझें
जिथें हळूं उमललें
अर्धपुष्प जीवनाचें

झाडीमध्यें डोकावते
उंच मंदिर अंबेचे
तयानेंच सांगितलें
ध्येय माझ्या जीवनाचे

जिथें वळली सरिता
उड्या घेतल्या अपार
जिंथें खेळलों लोंबलों
तोही पिंपळाचा पार

मधुनच दिसतात
घरें कौलारु सोनुली
उंच उंच आंब्रराई
आजोबांनी लावलेली

जिनें रसाची माधुरी
माझ्या भरली जीवनीं
जिथें निसर्ग संगीत
नित्य येई माझ्या कानीं

कडे कडेने वाहते
वैजयंती हि शिवेच्या
गांठण्यास मंत्र दिला
जीवनाचे ध्येय माझ्या

याच स्मृति भोवताल
याच स्मृतींत वाढलें
जीवनाचे पुष्प सान
घोटाळतें माझें मन

## वेड्या मायेच्या रीती :

—मुकुंद शेळके

नऊमासाचा पुतळा
त्यास दिले देवपण
सोसल्या यातना तूं
तूंच पत्करले मरण . . .
माया मातीत झुरली
जग मातीचे बनलें
आस तुझ्या हृदयाची
कायमचे जग उरले . . .
वेड्या मायेच्या रीती
मातीवर फुलणार
माती मातीतून येते
मातीतच मुरणार !

**नव्हते माहित :** वसंत राजस,

नव्हतें माहित मजला सखया
जुळेल अपुले नाजूक नाते
ओढ लागली तुझीच हृदया
घडलें कैसे ठावूक ना तें !

मादक तव ते, मदन बाण रे
अंतर माझे. विंधून गेले
व्याकूळ होवून, फडफडणारे
प्रीत पांखरुं – जखमी झालें !

भोळी भाबडी – तुला पाहूनी
बावरल्यें मी, प्रथम दर्शनी
रुप तुझे पण, हृदय दर्पणी
पुजूं लागलें भाव फुलांनी !

नको भंगवूस, प्रीति – स्वप्ना
बहर येवू दे असाच जीवना
जीवन प्रीतिचे सिंचूनि घडवूं
जीवन बाग ही, फुलवूं खुलवूं !

**देण :** वसंत राजस

नको नको प्रासाद तें
आणि बिजली प्रकाश
हृदयींच्या महलांत
मंद तेवो तेल वात !

माझ्या साध्या झोपडींत
वात्सल्याला नाही वाण
आई बाप यांच्या सदा
येई प्रीतिला उधाण !

अंतरीच्या सागराला
उधाण ये क्षणोक्षणीं
आहे भरलें जीवन
सुख दु:खाच्या लाटांनी !

कोणी निंदो कोणी वदो
नको मज मान पान
विशाल त्या सिंधु सम
व्हावे मोठे माझे मन !

ज्यो त :    वसंत राजस

ती पहा ! ती पहा ! दिव्यत्वाची प्राणज्योति
अन्तरीच्या शान्तिसाठी बुद्ध चरणी चालली ती !
सप्त कोटी मानवांच्या अश्रु–माला सांडताती
आळवूनि पंचप्राणा भाव फुलें वाहताती !

रंगला रंकासवें हा, सत्तेसवें हा झुंजला
प्राण हि लावी पणाला जीवनाची हीच क्रांती !
जाळिली स्मृति–पुराणें, मानवांच्या मुक्तिसाठी
जागविली सूप्तशक्ति पेटविली दिव्यज्योति !

भारताच्या शिल्पकारा, तूंच त्राता दीन नाथा
कोण वाली रे दुजा तो, दीन जीवा सांग आतां ?
सत्य, समतेचा पुजारी, लोक शाहीचा चितारी
त्यागी योगी, युग पुरुषा फिरुनि ये तूं भूवरी !

'नाहींच्या' या सागरांत शोधितो मी अेक मूर्ति
ना मिळाली देवळांत; ती तुझी रे दिव्य मूर्ति !
ती पहा ! ती पहा ! दिव्यत्वाची प्राणज्योति
मानवांच्या मुक्तिसाठीं बुद्ध चरणी चालली ती !

• • •

“ ही ” आणि “ ही ” : ना. रा. किल्लेकर

“ रात्र किती झाली !
तरी सुद्धां अजून
कां नाहीं आले ? ”
असें म्हणून—
दारांत उभें राहून—
हक्काच्या माणसाची
मार्गप्रतिक्षा करणारी
ही ! …………

“ रात्र किती झाली !
अजुन कुणीच
कसं दिसेना रस्त्यावर ”
असें म्हणून—
तोंडांत पान, गालीं पावडर
चोपून पातळ नेसून
येणाऱ्या जाणाऱ्यांची
दारांत उभें राहून—
मार्गप्रतिक्षा करणारी
ही ! …………

**हवी मज :** राम भोयर

तुझ्या विरहाचा क्षण
वाटे मज दीर्घ काळ
आठवतो पुन्हा पुन्हा
संगतीचा दीर्घ काळ...

तुझ्या संगतींत माझी
फुलतसें प्रीत कळीं
प्रेमिकांच्या प्रीतिहून
आगळी, जगा वेगळी...

तुझ्या विरहाची व्यथा
जाळते ग माझ्या मना
असे विना दिसतात
भाजल्याच्या स्पष्ट खुणा...

भाजल्याच्या स्पष्ट खुणा
पुसायाला हवी आज
शांत निर्मळ प्रेमळ
सखे ! तुझी प्रीत मज...

• • •

**जगण्यांत अर्थ :** म. भि. कुळकर्णी

जाळून देह, वाढे, यश थोर कांचनाचें
पाहूनि ह्या यशाला, मनीं मोर भोर नाचे !
लागुन आंच ऐसी, कृति शून्य या तनूला
होणार केधवा हो, उपयोग हिंदभूला
निःसार जीवनाची, जरि आग जाळिता हे
सेवेत मातृभूच्या जगण्यांत अर्थ आहे !
जगण्यांत अर्थ आहे !!

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 39470 वि: गन्धवती
क्रमांक 9539 नों: दि: 24.11.61

अकरा

उल्का : निर्मला धोत्रीकर

संथ वाहती समिरण लहरी, तटिनीवर मंद झुळझुळे
मृदु मधुर संगीत गाते हर्षित मानस होय तिथें...

समय जाहला अस्तमानचा रजनी ये चोर पाऊलीं
विशाल ह्या नभो अंगणीं चंद्रिकाहि हांसत येई...

नंदनवन जणूं फुललेलें बहराचि आला प्राजक्ता
रात राणी अन् निशिगंधांनी हसुनी स्वागत करी अहा...

त्या दृश्यानें संमोहित मी तिथें थबकलें काय तरी ?
तोंच आला दीर्घ उसासा, ऐकूं मजला पथावरूनी...

कोण बरें हे, रूदन करितें धैर्य धरुनि हळूंच पुसे
पाषाणांतूनि मानव वाणी सांगु लागली मीच असे...

भय विस्मित मी झाल्यें, वदली शीला ' अेक कथा '
नको बावरूं तुज कळेल, जीवनाची व्याकूळ व्यथा...

नव्हे नव्हे मी ' शीला खंड ' होत्ये चंद्रिका अेकें काळीं
अभिमानाने मिरवित होतें दिव्य तनुला त्या काळीं...

अेके रात्रीं दीन दयाळू युवक पाहिला भूमिवरीं
तुच्छ वाटली स्वर्ग संपदा उणा भासला स्वर्ग मनीं...

परोपकारी निशिदिनी त्याचा कष्टत होता देह सदा
तन मन आणिक स्वप्राणाची पर्वा नच तो करी कदा...

निश्चय मनीं मी केला तेव्हा तये संगती करीन सेवा
व्यर्थ चमकणें नभीं कशाला झोपडींत मी होईन दिवा...

धनिकांच्या त्या भव्य महालीं झगझगणाऱ्या दीपज्योति
प्रकाश देईन तमांत बुडल्या कुटीस मी होवून पणती...

दीनास्तव ही वसुंधराहि, सुजला सुफलाम् नीत होते
पाषाणाचे हृदय त्या स्तव अहोरात्र हे पाझरते..
अशा भू वर जावुनी सत्वर जीवन सार्थक करीन मी
अज्ञानाच्या घन तिमिरासी क्षणांत अेका उजळीन मी..
निश्चय कळतां मम् पित्याला वळवी मजला बहूपरी
ढळें न ध्येया पासून तरीहि झणिं निघालें भूमिवरी...
पिता कोपूनि शापित मजला अधः पतित तूं आता झाली
काया पालट तव हा होवो तारा नच तूं शीला बरी..
व्यर्थाचि गेलें जीवन माझें खंत वाटते ही मोठी
दुःखामध्यें समाधान हें झटलें पण मी ध्येयासाठीं!
ध्येयासाठीं!!

• • •

## रुसलेल्या कृष्णास: निर्मला धोत्रीकर

नंद किशोरा, श्रीरंगारे, अम्हावरी वद, कां रुसला?
गोपी आम्ही, शरण तुला, बघूं दे नयनीं, तुज हंसलेला!...
गोरक्ष घट तूं, जरी प्राशिला, कुणा न परि तें मी कथियलें
नव नीत चोरूनी, व्रज बाळांना, तूंच कन्हैया वाटियलें
झरोक्यांतूनि यत्न पळाया, तुझा मुरारी तो फसला...
यमुना तिरीं, जल भराया, घेवून जातां आम्ही घडे
बसुनी कदम्बा, वरी मारिसी, तूंच खड्याला वरुनी खडें
रंग टाकितां, अंगावरती, शालु मोतिया बघ भिजला...
जाणियलें मनीं, तूं परमात्मा, व्यापून उरला अणू रेणू
शत जन्मींचें, पुण्य म्हणुनी, श्रवणीं पडलीं तव वेणू
तुज शोधिलें, शाम मुरारी, सर्व व्यापी तूं, जरी असला...

**ओ ढ :** निर्मला धोत्रीकर

नौका चाले भरा भरा, अन् असा वाहतो–
अनुकूल वारा !
फेसाळल्या समिंदरा, अन् जायाचं रे घरा
जायाचं रे घरा . . .

वाहतो हा पवन रे, पवन असा मंदमंद
मंदमंद पाऊलाने, दरवळे निशिगंध
पूनवेचा चांद बघुनि, हर्षित मनीं खरा
होय मनीं खरा ! . . .

नारळाची राई तुझ्या, समिंदरा तीरीं आहे
तिथें झोपडींत माझी, माय माउलीच राहे
अमृताची सरिता रे, माझी पाहाया त्वरा !
माझी पहाया त्वरा . . .

• • •

**मा न वा च्या :** मुकुंद शेळके

मानवाच्या जीवनांत
सुख आहे । दुख आहे ।
जीवनाच्या प्रवाहांत
विकृतीची धार आहे ।

मानवाच्या हृदयांत
दिन रात जाग आहे ।
जागोजाग जागृतीत
गोड स्मृति पाठ आहे ।

मानवाच्या भावनेंत
संगीताची प्रीत आहे ।
संगीताच्या लहरींत
जीवनाचे सार आहे ।

मानवाच्या जाणीवेत
कला आहे । प्रेम आहे ।
कलाप्रिय मानवांत
संस्कृतीचा नाद आहे ।

• • •

## तीन अश्रु : निर्मला धोत्रीकर

सुरम्य ऐशा प्रभात समयीं, उपवन होतें फुललेलें ।
अनील लहरी सवें डोलती जिथें तरुलता कुंज फुलें ॥
भाविक कोणी आला तेथें लता अंकिच्या नवकलिकेला ।
खुडुन घेउनी वाहीं राउळीं मूर्ति वरतीं शुभ वेळा ॥
लता विचारी सदामनीं मुग्धच कालिका किती अजुनी ।
असो तरी ही भाग्य शालिनी लोळतसे पण प्रभु चरणीं ॥
प्राण अर्पिणें सत्कार्यास्तव महाभाग वदती सारे ।
समाधान अंतरीं मानुनी, नयना मधुनी सलिल झरें ॥
झाला क्षण ही ना पुरतां, मन्दिरी महापूजा चाले ।
मुग्ध अन् नाजुक कलिकेचें, तत्क्षणीं निर्माल्य ही झाले ॥
प्रहर लोटले तींन मन्दिरीं आली दर्शना कुणी युवती ।
शशांक वदना लाजाविणारी बाला निज संगे होती ॥
सुगंध मोहित होउनी शोधी अर्धोन्मिलीत कलिकेला ।
मुदित मन बालिका प्रभु पदीं वाही पुजारी परी वदला ॥
वेडे पोरी निर्माल्यच तें टाकून देईं त्यास त्वरें ।
ऐकुनी बोले दुःखित बाला लोचनि कां पण नीर झरें ॥
पुसें युवतीला "ताई" कलिका टाकून द्यावी ही ? ।
काय वदे हाय ! परी अभागी होती निर्माल्यच तीहि ॥
तिज आठवलें अशीच मुग्धा मीहि होते ।
असह्य होउन स्मृति अंतरी, अश्रुपूर मग नेत्रीं झरे ॥
असंख्य कलिका सुकल्या आजवर, आजही सुकती ना अंत ।
अभागिनी ही झाल्या, असती, कुणास त्याची ना खंत ॥

• • •

## माझा महाराष्ट्र : कृ. बा. राऊत

माझा हा महाराष्ट्र
किती हो भाग्यवान ! ॥ धृ० ॥

इथेंच ज्ञानोबाच्या, ओवींचा गंध येई
पावन इंद्रायणी अभंगांत दंग राही
गातो हा सह्यराज शिवाजी गुण गान
माझा हा महाराष्ट्र किती हो भाग्यवान !

माझिया महाराष्ट्रांत नाचली मुक्ताबाई
पांडुरंगा कुशीं विसावे जनाबाई
पंढरी वाळवंटीं रंगलें किर्तन
माझा हा महाराष्ट्र किती हो भाग्यवान !

ज्ञानाची ज्ञानेश्वरी दासाचा दासबोध
तारिती बुडत्यांना पाजून ज्ञानबोध
आम्हां मऱ्हाट्यांना अमर होचि धन
माझा हा महाराष्ट्र किती हो भाग्यवान !

माझ्या या गोदा कृष्णा खळाळ वाहताती
शिवारें काळी शार मोदांत डोलताती
फिकेंच यांच्या पुढें जगाचें नंदनवन
माझा हो महाराष्ट्र किती हो भाग्यवान !

इथे न असत्याला, कदापि हो थारा
सत्य नि स्वाभिमान, याचा वाहे वारा
झुकविल ना कधी, अन्यायाला मान
माझा हा महाराष्ट्र किती हो भाग्यवान !

**अन्धार :** अशोक पाटील G. D. Art.

सुखवी मज करुणामय अंधार..........
ज्याच्या जवळीं मुक्त मनानें
आपुलकी अन् विश्वासानें
स्रवती अश्रु धार – सुखवी मज करुणामय अंधार–
शाम पटावर उदासतेनें
स्मृतिचित्रें रेखित मन हे
मिटूनि नेत्रद्वार – सुखवी मज करुणामय अंधार–
श्रमल्या दमल्या विश्वाला या
कुशींत घेऊनी कुरवाळी हा
देत मना आधार – सुखवी मज करुणामय अंधार–
नवस्फूर्तिनें उभवित स्वप्नें
मनास रिझवित गातो कवनें
घेऊन मी आधार – सुखवी मज करुणामय अंधार–
रुजवित अशांकुर आत्म्यांतुन
स्फूर्ति लाभते ज्या स्पर्शांतुन
सजवित प्रतिभागार – सुखवी मज करुणामय अंधार–
प्रशांत समयीं प्रतिभा लहरी
सहज उमटती मन मंदिरी
करि धुंद विहार – सुखवी मज करुणामय अंधार–

• • •

## श्रावण :

कृ. बा. राऊत

संपला आषाढ
पातला श्रावण
थांबलें काजळी
मेघांचें क्रंदन !

पुसलें रूपेरी
विजेचे संदेश
ओसरे दर्याचा
उद्दाम आवेश !

मंदावें वादळी
वाऱ्याचें स्फुंदणें
स्थिरावें ताडांचें
माडांचें झिंगणें !

तृप्तली सरिता
तियेचे गोत्रज
वृक्षांना लतांना
हरित् वर्ण साज !

हंसलीं शिवारें
धुंदलीं वासरें
घुमलें बागांत
गंधाचे नगारे !

पर्जन्य उन्हाचा
जसे जिवाभाव
लागले खेळाया
आणि लंपडाव

प्रसन्न तलाव
प्रसन्न विहीर
सजल दिशांना
तृप्तीची किनार !

संपली तपस्या
ध्यानस्थ गिरींची
विराजे मुखीं त्या
प्रभा दिव्यत्वाची !

तुकोबा चोखोबा
राऊळी घुमले
घुमता श्रवणीं
मानस तोषलें !

● ●

**अनोळखी उम्बरठा :** अशोक पाटील, G. D. Art

नांद सुखाने सौभाग्याने. आशिष तुजला असे पुरा
मोठ्या घरची तूं मानाची, सून स्मरण हे ठेव सदा।
जपून ठेवी ग, पाऊल या, अनोळखी हा उम्बरठा—
स्वर्लोकांतून, अमृत भरुनी, आल्या माझ्या गेही घटा।
लाख दीप जणूं गृही लागुनी स्वर्णासम ते लखलखलें—
झगझगल्या या किरणामध्यें, रूप तुझें ग हळुंच हंसलें
रुणु झुणु रुणु झुणु नाद निनादें, पदन्यास तव मंगल हा
संगीतमय मज विश्व जाहलें, मधुर राग नवा अहा!
मनोरथाचे महाल रंगुनी, रंग विखुरला नभीं नवा
इंद्र धनुच नभीं बिंबला, तव रुपाने मोहक हा—
शुभ्र चांदणी लुकलुकते, प्रभा उजळित रम्य अहा
मांगल्याचे शुभागम, उजळित माझे स्वप्न पहा
नांद सुखानें सौभाग्याने, आशिष तुजला असे पुरा
मोठ्या घरची, तूं मानाची, सून स्मरण हे ठेव सदा—

• • •

**आज :** सौ. सिंधु खडाईत

परसांत बाई माझ्या
चांदण्याची बरसात
अन् माझ्या भावगीता
देरे वाऱ्या तुझी साथ

मंद गंध वाऱ्यावरी
शांत आज विसावला
आणि योगी पारिजात
अंगणांत बहरला

देवा कशी जादू केली
आज हासते वसुधा
छान सुरई चंद्राची
सुषमेची मधु सुधा

आज पाहते दर्यांत
तेज प्रवाही जाहलें
मनी लागते चाहूल
जग मोदांत नाहले

## कधीं कधीं : विनायक कुळकर्णी

कधीं कधीं वाटे मला
प्राजक्तिचा व्हावे गंध
दाहीं दिशा उधळावा
माझ्या अंगीचा सौरभ...
कधीं कधीं वाटे मला
सरितेचे व्हावे पात्र
तहानल्या पांथस्थांना
अमृताचा द्यावा घोट...
कधीं कधीं वाटे मला
सागराची व्हावी वीचि
भारताच्या कौस्तुभाला
द्यावी जीवन आहुति...
कधीं कधीं वाटे मला
सह्याद्रिचा व्हावे कडा
पूर्वजांच्या घुमटांत
घुमवावा माझा गळा...
कधीं कधीं वाटे मला
कृष्णरंगी मेघ व्हावे
कृषिवलांच्या हाकेला
सादसदा जल द्यावे...
कधीं कधीं वाटे मला
पणतीची ज्योत व्हावे
दु:ख दैन्य तिमिरीला
क्षण एक उजळावे...

## वि द्ध : प्र. अ. भारती

मृग नयनांत माझ्या
कांचनाचा : मदनाचा
सोडी बाण रामराया
विद्ध रतीला कराया

• • •

## अं कु र : मुकुंद शेळके

झाडावर आयुष्याच्या
आला आशेचा मोहोर
बुझते स्मृति कोवळी
आणि उरतो अंकुर !

उरलेल्या स्मृतीवर
होई सिंचन मधुर
गोड रस भावनेचा
केला प्राशून अमर !!

* * *

**च ढ ता ला ली :** रा. ना. पांडे

प्रेम वितानी उडतां उडतां
क्षणांत गेलें त्याच्या हातीं
स्पर्श सुखाचा होता मजला
स्फुरण पावलीं प्रफुल्लता मी

विसरुनी गेले मींच मला अन्
चुंबुनी गेला खट्याळ मेला
गालांवर ती चढता लाली
चापट मारुनी असा पळाला !....

* * *

**म द न :** रा. ना. पांडे

दारा आड लपलेली
खट्याळ तूं पाहतेस
नयनांच्या कडापरी
आसुसल्या भासतात !....

नीळसर नयनांत
काळी रात्र रेखतेंस
माझ्या वेड्या हृदयांत
रात्र रात्र वसतेस !....

अशी माझ्या हृदयांत
राहूनिया लावी आग
आग विझविण्या आता
खरें मदनाला जाग !....

• • •

## सूर्योदय : वा. शं. हाते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 20440
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

कधीं पासुनि चालला कुणी वाटे
अति हर्षे पथ आक्रमिते नेटें
मनीं आशा परि एक असे साची
सूख सोहळा सृष्टीचा बघायाची

निशा अंधारी हळुहळूं विरळ झाली
पक्षी सारे किलबिलति भोंवताली
मंद वारा झुळुं झुळूं पुढे चाले
भक्त भूपाळ्या गोड गात आलें

गोड गाणीं ऐकुनी उषा नाचे
नाच पाहुनि पूर्वेस येई हांसे
तया निकटी ही मौज बघायाला
प्रवासी तो रविराज नभीं आला

* * *

## तक्रार : रा. वि. कुळकर्णी

वाट तुझी कोठवरी
सखे ग पाहावी ?
परी तुज मीलनाची
आसहि नसावी . . .

मनीं मधुर आशा मी
घेवूनिया आलों
निराशाच तूं पदरीं
हाय परी द्यावी . . .

अशी कशी ही, जगा वेगळी
रीत तुझी प्रीत
व्याकूळ व्यथा, विरहाच्या
मोद गमे देण्यांत ?

* * *

## दिवाळी : रा. वि. कुळकर्णी

सारावाढ करूनि हिंद जनता अन्नान्न झाली अति ।
तसा जंगल आणि मीठ करहि जाची प्रजेला किती ? ॥
नेती दण्डमिषें धुवून सगळें जें राहिलें साहिलें ।
'**लक्ष्मीपूजन**' साजरें मग तरी होईल बा कोठलें ? ॥

पत्नित्याग करोनि शूर समरा गेले किती ना कळे ।
नाथा सोडुनि जाति परि युवती स्वातंत्र्य युद्धां बळें ॥
पाशा तोडुनि माय बाप त्यजुनी सत्याग्रही पातला ।
गेले जे सकुटुंब शांतिसमरा त्या '**पाडवा**' कोठला ? ॥

स्वातंत्र्यास्तव देश बांधव किती कारागृहा सेविती ।
तैशा प्रेमभरें कितीक भगिनी जाता तया ना मिती ॥
स्नाना पाणी नसे, क्षुधाहि न बुझे, लंगोटिहि ना पुरी ॥
कैशी ती मग '**भाऊबीज**' अपुली होईल बा साजिरी ? ॥

* * *

## शोध :

दिनकर यशवंत हरणे

शशांकाच्या शोधासाठीं
घोर तिमीरी फिरलों
खऱ्या खुऱ्या प्रेमासाठीं !
वणवण भटकलों

तहानलों व्याकुळलों
मृगजळास भाळलों
तुझ्या शोधासाठी देवा
मंदिरांत अशा आलों

• • •

## शक्ति : वा. शं. हाते

अनंत कोटी ब्रह्मांडाचा निर्माता देव
सजीव, निर्जिव चराचरांचा चालक अधिदेव
सूर्य चंद्र, ग्रह, तारें निर्मी मालक स्वर्गाचा
व्याप तयाचा फारच मोठा झाला विश्वाचा

साह्य पाहिजे होतें त्याला विश्व चालविण्या
पृथ्वीवरती नेमियले मग तयें मानवाला
मानव बळकावूनी बसला पृथ्वीचें राज्य
झुगारूनी देवाला स्थापियेलें साम्राज्य

स्वर्गांतील ती वीज ओढिली मनुजाने खालीं
पृथ्वीवरती राबविण्याला त्याने लावियली
बालचंद्र लाविले फिराया पृथ्वीच्या भवतीं
नव सूर्याच्या करी कल्पना या पृथ्वीवरती

चंद्रावर हा करील स्वारी, मंगळ घेईल
गुरू, शुक्र, शनि या सर्वांना खचित जिंकेल
विज्ञानाने लढेल मग तो निर्मात्याशीहि
हारविल अन् त्या अचाट शक्तिलाहि

* * *

## चंद्रा! : मा. न. सोनार

दुरुनीच काय "चंद्रा" । करितोस गोड मैत्री
आमुच्यांत खेळण्या ये । या रम्य शांत रात्रीं–
किती खेळशी ढगांशी । ऐशी लपाछपीं तूं
आमुच्यांत खेळ तैसा । मानीं मनीं न किंतू–
उघडाच फिरशीं कां रे । हरवलास काय सदरा?
रागावली आई कां? । दिसशी परंतु हंसरा–
कां नाही ऐकूं येत । मम बोलणें अजून
खोळंबलो आम्हि रे । येई जरा जपून–
मी हाकमारी प्रेमें । "मामा" म्हणून तुजला
तूं थोर मी लहान । धरि ना कधीं अबोला–
मी चालताच तूंही । रे लागतोस चालूं
हलताच मीही तूंही । रे लागतोस हालूं–
चिडवूं नकोस ऐसे । ये खेळूं मित्र मिळुनी
नाचूं हसूं नि गाऊं । फेरांत गोड गाणीं–
पाहून रूप तुझें । लागे मनास वेड
ये खेळुनीच पुरवी । तूं आमुचेच कोड–
येशी न कां अजून । कां घेतलीस कट्टी
ये आईला पुसूनी । खेळू करुन गट्टी–

• • •

## कशाला जाऊं मुंबापुरीं ! : बा. मा. हराळे

**शेती-भाती जीवन माझें असतां माझ्या घरीं !**
**कशाला जाऊं मुंबापुरीं !!** ॥ध्रु.॥

माय माऊली शेती माझी, तिचेच मी लेकरूं
वात्सल्याला सुखद तिच्या मी, कसा बरें अंतरूं ?
तिच्या कुशीची ऊब लाथडुनी, कृतघ्न मी कां ठरूं ?
तिचीच मजला कास, ध्यासही लागो जन्मान्तरीं !!? ॥१॥

सखे सोबती बैल संगती घेऊन रात्रंदिन
करिन मशागत सालभरी मी तन मन धन वेंचून
घामांच्या मोत्यांस पांचुचे बनवुनि अन् कोंदण—
स्वर्गांतील तें नंदनवनहि उतरिन धरणीवरीं !! ॥२॥

देवदयेनें पडेल पाऊस मनासारखा पुढें
वाजतिल मेघांचे गगनीं धुडुमधुडुम चौघडे
सुटेल तेव्हां जीवन कोडें मिटेल मग सांकडे
चमकतील झुंबर मोत्यांचें कणसाकणसावरीं !! ॥३॥

दुष्काळाची उडेल गाळण, सुकाळ अन् भारतीं—
धन धान्यांची होईल चंगळ, समृद्धी शाश्वती
धरणीची ही दौलत अन् मी कनवाळू भूपती
करिन तिची राखणी फिरवुनी गोफण माळ्यावरी !! ॥४॥

स्वयंसिद्ध राहूनी निरंतर जागवीन हा भारत
पडो न देइन वाण कशाची, कष्टून अव्याहत
संजीवन पुरवीन जगाला होऊन सेवारत
स्वातंत्र्याचे दिवस सुखाचे चालुन येतां घरीं !! ॥५॥

• • •

**प्रभात :** भुजंग अ. देशपांडे

स्वातंत्र्याची प्रभात झाली
तिमिर सारा दूर पळाला
भारत भूच्या विकास कार्या
अवघा भारत जागा झाला !

पूर्वजांनी अति कष्टानें
पाया खोदून पहा ठेवला
भारत भूच्या शूर वीरानों
नवीन इमला उभवूं चला !

दणकट मनगट निधडी छाती
छातीलाहि लावूं माती
मातींतून या काढूं धूर
सोनियाचा चला चला रं !

कामाचा तर डोंगर पडला
अता विसावा नाही-नाही
वैभव शाली शिखर गांठणें
ध्येय याहूनी दुसेर नाही !

**शाप :** भुजंग अ. देशपांडे

असेच कां हे, जीवन जगणें
निर्माल्याचे भाल घेवूनी
जगणें कसले मरण खरोखर
असाह्यतेचे ओझे साहूनी....

शोध सुखाचा करण्यासाठीं
धावत गेलो कडें कपारीं
बोल प्रीतीचे पडतील कानीं
याच व्यथेनें केली वारी....

क्षितिजा वरती काय चमकलें
सोने समजून तिकडे गेलो
परंतु होता शाप नशिबी
लोखंडाचा पुतळा बनलों....

• • •

**बा हु ली :** गो. स. कोसटवार

ममबाळी ही मुकी जाहली दृष्ट लागली छकुलीला
हालेना कीं बोलेना मुळी काय जाहले बघ तिजला ॥ १ ॥

किती किती मी आर्जव करतें भरवायासी बाळीला
जरा उघडीना तोंड मुळीं ती कुलूप घातलें कीं त्याला ॥ २ ॥

नवें नवें ते चोळी परकर सुंदर फ्राक फुलवाला
पायीं तोरड्या घुगुंरवाले सुरेख ऐरींग कानाला ॥ ३ ॥

रुसून बसली माझी सोनुली कुणी बोलले का इजला
मारीयलें कां सांग! कोणी कांही न उमजें मुळीं मला ॥ ४ ॥

काय करुं ग बाई आता बेबी माझी समजेना
नाना परीचें खाऊ दिधलें परी पोरगी उमजेना ॥ ५ ॥

रुसली फुगली मुकी जाहली राग कुणाचा तुज आला
सांग छकुले हळूच मजला नवरा काय हवा तुला ॥ ६ ॥

पटकन जाते झटकन येते छान आणते नवरोबा
अता तरी तूं बोल बाई ग नको बसू तूं धरुन दबा ॥ ७ ॥

• • •

**जीवन तारा :** प्र. अ. भारती

पोटा !
तूं आहेस म्हणूनच
या वसुधेवरील सर्व जिवाणूं
आणि ह्या लता लतिका देखिल
धडपडताहेत
तडफडताहेत
ते केवळ तुझ्याच साठीं
तुझी केवळ इवलीशी पोकळी भरण्यासाठीं !
पोकळी ?
हो, पोकळीच
अन् तीहि वीतभऱ्याची
सानुली अन् सोनुली
जी या पाठीस लागली आहे
या अवघ्या विश्वांतील
जीव जिवाणूस
आमरण तडफडून
धडपडून
मर मर श्रमून देखिल
कधीच कायमची भरता आली नाही ती !
भरते—
अन् कायमचीच भरते—
पण ती एकदांच
हे काळ पुरुषा—
नव जीवन दात्या
अगदी अखेरच्या
तुझ्या केवळ एकाच घासाच्या श्वासानं !

मराठा ... स्वच्छमत.
अनुक्रम 31548 वि: ...
9432 नों: दि: ...

आग ! आग ! आणि आग
तुझ्यांतली सदैव धगधगणारी जाग
जागवितें जगाला त्याच तीव्र दाहकतेनं.
इटुकल्या कोमल मृदुलतर अंकुरा पासून
महान गगनभेदी विशाल तरुवरा पर्यंत
विश्वांतील अवघ्या जीव जिवाणूला
क्षणा क्षणाला
छळून—
भाजून
आणि पोळून
तळून काढणारी तुझी आग !
निसर्गाच्या अमोल जीवन दायीं
तांबड्या शीतल अनुपम जलाचें—
जीवन रसाचे—
श्रमाच्या झारींतून सदैव सिंचन करुनहि
कधींच न शमणारीं
न विझणारी
अशी ही आग
एकदांच विझते
शमते.

पण केव्हा ?
जीवनभर श्रमून देखिल
अमोल जीवन रसाचे सिंचन करूनहि
तुझी ती आग न शमवूं शकणाऱ्या
आपल्या पराजित

हतबल बालकाची
दु:ख, खेद–खंत
यांनी व्यापून गेलेली अनास्था पाहून
जेव्हा तो काळपुरुष
कायमच्या विसाव्या करितां–
मोठ्या ममतेनें
सुखद कुशींत उचलून घेण्याकरितां–
धावून येतो
तेव्हांच, आणि फक्त तेव्हांच !
त्याच्या मायेच्या कृपा सावलींत
देण्यांत येणाऱ्या
अखेरच्या अमृततुल्य गोरसाच्या एकाच पळीनं
जन्मभर निरंतर धगधगणारी आग
तेव्हांच, त्याचक्षणीं शमतें, विझतें ती कायमची
परंतू
आमरण तडफडणाऱ्या
धडपडणाऱ्या जिवाला जणू धि:कारून.

पोटा !
तू आहेस
तुझी इवलीशी
वीत भऱ्याची पोकळी आहे
त्यांत कधीच न शमणारी आग आहे
म्हणूनच
हे सारं जग आहे, हे अवघे विश्व आहे !

ग्रन्थ वृ.शी
3158 वि: ... नों: दि: 24/8/...
क्रमांक 9...

माया–ममतेनं; राग–अनुरागानं;
लोभानं–दंभानं; सुखानं–दुःखानं;
सूड, द्वेष, कोमल, कठोर आदि भावनेनं
ईर्षा, इच्छा, उन्मेष, उन्माद, आशा–निराशेनं
श्रमानं–ज्ञानानं; विकासानं–विनाशानं
साऱ्या भाव - भावनेनं
सारं जग व्यापून गेलं आहे– भरुन गेलं आहे
आणि क्षणा क्षणाला विकासित होत आहे
बदललं आहे, बदलतं आहे, नाविण्यानं नटते आहे.
नव रूप, नवा रंग. नवा जोम, नवा होम, घेत आहे न् देत आहे

पोटा !
तुझ्या मुळेच
या जगांत धडपड आहे
कळकळ आहे, तळमळ आहे
आंतरिक ओढ, आस्था साहस आणि सायास आहे.
अचाट शक्तिचे; अनुपम अपूर्व कलेचे
कुशल बुद्धीचे दिव्यत्वहि आहे.
आणि त्याच बरोबर
अन्वनित हाल, कष्ट भोगण्याची
सहनशीलताहि आहे.
आणि म्हणूनच
आजचा मानव
' मानव ' म्हणून मोठ्या दिमाखानं अन् डौलानं
जगांत मिरवितो आहे.
बेपर्वाईनं !

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १०४५०
... शाखा

पोटा !
जर कां ही तुझी
वीत भऱ्याची पोकळी नसती. . . . .
त्यांत न शमणारी ती आग नसती.
तर–
तर काय ?
हे सारं विश्व निर्जिव, निष्प्रभ झालं असतं. . . . .
ना विकास ना उज्वलता
केवळ महाघोर तिमिरानं भारुनं गेलं असतं
तूं आहेस म्हणूनच
जगांत सारं कांही आहे, खरं कांही आहे.
तुझा इतका थोर महिमा आहे म्हणूनच
विश्व वीणेच्या अगणित, अमाप जीवन–तारा
क्षणा क्षणाला निनादत असतात.
अेकाच सूरांत, एकाच तालांत
एकाच स्वरांत–
म्हणत असतात
पाठीवर मारा
पण
पोटावर मारुं नका !
पोटावर मारुं नका !!
पोटावर मारुं नका !!!

REFBK-0010550

REFBK-0010550

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१८५८ वि. ...
क्रमांक ७५३६ नों. दि. २४/११/८६

• • •